ePaper

**माझ्या हत्येचा कट रचला होता, काळं फासल्यानंतर प्रवीण गायकवाडांचा आरोप!**

| वर्ष - 8 | अंक - 335 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- सायना नेहवाल-पारूपल्ली विभक्त
- वॉशिंग्टन सुंदरची स्वप्नवत स्पेल!
- विमान कोसळण्यापूर्वी काय झाले?
- “भाई, मैने कन्या वध कर दिया”


www.mahaenews.com | सोमवार, दि. 14 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आगामी निवडणुकीसाठी कामाला लागा

# अजितदादा ॲक्शन मोडवर!

## पुण्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाची महत्वाची बैठक; कार्यकर्त्यांना आदेश

| पुणे | प्रतिनिधी | महाईन्यूज

**राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकांचे बिगुल वाजणार आहे. यामध्ये राज्यातील मोठ्या महापालिकेसाठी राजकीय धुरिणांना मोठी कसरत करावी लागणार आहेत. यातच पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादीची मजबूत पकड आहे. राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत जनमानसात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातून मोठी बातमी समोर येत आहे.**



पुण्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडण्याचे संकेत आहेत. कारण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. पुण्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाची महत्वाची बैठक पार पडली. यावेळी अजित पवारांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीकरिता संघटना वाढीच्या सूचना दिल्या आहेत. माध्यमांशी संवाद साधताना अजित पवार म्हणाले की, ‘निवडणुका जवळ आल्या आहेत, मी पालकमंत्री आहे. पुणे महानगरपालिका आमच्याकडे होती. अनेक वर्ष दोन्ही महानगरपालिका सत्तेत होतो. आता आगामी निवडणुकीसाठी संघटना वाढवण्यासाठी कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.’ तर अजित पवारांनी कार्यकर्त्यांना म्हटले की, निवडणुकीचा जो निर्णय होईल तो होईल, आपण आपली प्रत्येक प्रभागात तयारी करा. पुण्यात प्रत्येक प्रभागापर्यंत पक्ष पोहोचवा, सदस्य नोंदणी करा, मी स्वतः पुण्यात पक्षात लक्ष घालेन, या सर्वांचा मी ऑगस्ट महिन्यात आढावा घेईन’

दरम्यान, नवीन शहराध्यक्षांना कार्यकारिणी तयार करून कामाला लागण्याच्या सूचना अजित पवारांनी दिल्या. तसेच ‘निवडणुका एकत्रित लढवायच्या का यामध्ये सगळे निर्णय युतीबाबत वरिष्ठ घेतील,’ असेही पवारांनी नमूद केले आहे.

### पुण्यातील कार्यक्रमात अजित पवारांनी व्यक्त केली दिलगिरी

उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज पुण्याच्या दौऱ्यावर आहेत. आज सकाळपासूनच ते ॲक्शन मोडवर असल्याचे बघायला मिळाले. मला यायला उशीर झाला म्हणून दिलगिरी व्यक्त करतो, मी हिंजेवडीला नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी गेलो होतो म्हणून उशीर झाला, असल्याचे अजित पवारांनी म्हटले. 2025 मध्ये तुम्ही संस्था काढली ही मागेच निघायलापाहिजे होती. कमिटीने भूमिका तुमच्या समोर मांडली उद्घाटन होण्यापूर्वी मला निवेदन देण्यात आलं. ज्यामध्ये काही मागण्या केल्या, उद्घाटनापूर्वीच मागण्या आल्या. हे केवळ तांत्रिक क्षेत्र नाही तर मानवी जीवनाला विकासित करण्याचे क्षेत्र आहे. इंजिनियरिंग फक्त पायाभूत सुविधा देत नाही तर समाजात नवीन ऊर्जा देते. अजित पवार पुढे म्हणाले की, पुणे जसे विद्येचे माहेर घर आहे, तसे अभियांत्रिकी आणि औद्योगिक क्षेत्रपण बनले पाहिजे. ही संस्था विविध विद्यार्थ्यांना राज्याला व देशाला विकास करण्यासाठी प्रेरणा देईल असा विश्वास व्यक्त करतो. तुमचं निवेदन मी रात्री उशिरा पाहणार आहे. उद्या शेवटचा आठवडा अधिवेशनाचा आहे. आम्ही काहींना काम देतो ते कॉस्टिली होतात पण मजबूत होतात. अलीकडे सोशल मीडियाच्या माध्यमातून लवकर कळत की कुठला तरी ब्रिज पडला. ते आम्हाला नाही तर तुम्हाला लवकर कळत.

काही दिवसांपूर्वी मावळमध्ये ब्रिज पडला आणि नाहक लोकांनाच जीव गेला असं झालं नाही पाहिजे. 100 वर्ष झालेले ब्रिजचे आम्हाला ब्रिटिशांचे पत्र येत की, हा ब्रिज धोकादायक झाला आहे. अलीकडे नवीन टेकनिक आल्या आहेत, पण इमारत मजबूत झाल्या आहेत. आज आम्ही मुंबईत राहतो त्या इमारती किती जुन्या आहेत. परवा माझ्या पाहण्यात एक काम आलं. सिमेंट कंपनीचा एक लॉट आला ते खराब दर्जाचा सिमेंट लॉट आला म्हणून निकृष्ट दर्जाचे काम झाले म्हणून इंजिनिअरिंग किंवा कॉन्ट्रॅक्टर चुकला अशी भावना निर्माण होते, पण यामध्ये त्यांची चूक नसते.

### अनेक विकास कामे करत आहोत...

पुण्यात आम्ही अनेक इमारती बांधल्या. सिपी कार्यालय पुण्यात सुरू केले. एसपी कार्यालय सुरू केलं, पिंपरी चिंचवड पोलीस कार्यालय आम्ही सुरू केलं अश्या अनेक इमारती आम्ही केल्या आणि करत आहोत, या पद्धतीने आपण पुढे जात आहोत. नवीन यशदाची बिल्डिंग आम्ही करतोय, अश्या प्रकारे बरेच कामे चालले आहेत, पण रस्ते आणि पाणी पण चांगलं असलं पाहिजे. शहरी करण्यात मोठ्या प्रमाणात लोक येतात, त्यामुळे लोकसंख्या वाढत आहे. लोक सांगतात 100 वर्षात असा पाऊस कधी पडला लोक सांगता आम्ही असं पाऊस कधीही बघितला नाही, जपानला 5 टक्के भूकंप येतो, अशी माहिती आली होती, पण लोक थांबत नाहीत, असेही अजित पवारांनी म्हटले.

# पुणे-लोणावळा लोकल आजपासून पूर्ववत

## खडकी रेल्वे स्थानकाच्या कामाचा सेवेवर परिणाम

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मध्य रेल्वेच्या लोणावळा-पुणे विभागातील खडकी रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणी आणि विस्तारीकरणाच्या कामाचा परिणाम दुसऱ्या दिवशी मोठ्या प्रमाणात जाणवला. पुण्याहून मुंबईला आणि मुंबईहून पुण्याला येणाऱ्या गाड्यांना रविवारी विलंब झाला. याबरोबरच १३ उपनगरीय रेल्वे (लोकल) सेवा बंद ठेवण्यात आल्या.**



शाळा-महाविद्यालय आणि कार्यालयीन सुटी असल्याने लोकल सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असला, तरी सोमवारी (१४ जुलै) गाड्यांचा थांबा सुरू करण्यात येणार असून, लोकल सेवा पूर्ववत करण्यात येईल, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.रद्द करण्यात आलेल्या १३ उपनगरीय रेल्वेच्या सेवेत पुणे-लोणावळा, पुणे-तळेगाव, इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट (ईमू) समावेश आहे. रविवारची सुटी असल्याने फारसा परिणाम जाणवला नसला, तरी इतर कामानिमित्त तसेच पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसला.पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी खडकी आणि हडपसर या स्थानकांची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. या स्थानकांवरून लांब पल्ल्याच्या विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन असल्याने विस्तारीकरणाचे कामही हाती घेण्यात आले आहे. सद्यःस्थितीत खडकी रेल्वे स्थानकातील चार आणि पाच या फलाटांवर पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक काम झाले असून, तांत्रिक सुविधांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी रात्री १२ पासून शनिवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आणि रविवारी (१३ जुलै) दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या स्थानकातील लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा रद्द करण्यात आला.

त्यामुळे मुंबई-पुणे मार्गावरून धावणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या वेळापत्रकावर दुसऱ्या दिवशीही परिणाम जाणवला असल्याचे दिसून आले. दरम्यान, पुणे-लोणावळा-पुणे, पुणे-तळेगाव-पुणे मार्गावरील दैनंदिन १३ लोकलची सेवा पूर्णतः बंद ठेवण्यात आल्याने अनेक प्रवाशांना रस्ते मार्गाचा अवलंब करावा लागला.खडकी रेल्वे स्थानकाच्या पुनर्बांधणी आणि विस्तारीकरणाच्या कामांपैकी तांत्रिक सुविधांचे नियोजन असल्याने या स्थानकावरून रेल्वे गाड्यांचा थांबा रद्द करण्यात आला होता. आजपासून (१४ जुलै) सेवा पूर्ववत करण्यात येणार असून, नियोजित वेळापत्रकानुसार गाड्या धावतीलशाळा-महाविद्यालय आणि कार्यालयीन सुटी असल्याने लोकल सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला असला, तरी सोमवारी (१४ जुलै) गाड्यांचा थांबा सुरू करण्यात येणार असून, लोकल सेवा पूर्ववत करण्यात येईल, असे मध्य रेल्वेकडून सांगण्यात आले.रद्द करण्यात आलेल्या १३ उपनगरीय रेल्वेच्या सेवेत पुणे-लोणावळा, पुणे-तळेगाव, इलेक्ट्रिक मल्टिपल युनिट (ईमू) समावेश आहे.

### लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा रद्द

रविवारची सुटी असल्याने फारसा परिणाम जाणवला नसला, तरी इतर कामानिमित्त तसेच पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्या प्रवाशांना याचा फटका बसला.पुणे रेल्वे स्थानकावरील ताण कमी करण्यासाठी खडकी आणि हडपसर या स्थानकांची पुनर्बांधणी करण्यात येत आहे. या स्थानकांवरून लांब पल्ल्याच्या विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन असल्याने विस्तारीकरणाचे कामही हाती घेण्यात आले आहे. सुमारे ७५ टक्क्यांहून अधिक काम झाले असून, तांत्रिक सुविधांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.त्या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी रात्री १२ पासून शनिवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आणि रविवारी (१३ जुलै) दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या स्थानकातील लांब पल्ल्याच्या गाड्यांचा थांबा रद्द

# पुणे शहरासाठी स्वतंत्र पालिका आवश्यकच

## विभाजनाचा प्रस्ताव राज्य शासनाला देण्यावरही एकमत

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'शहराचा विस्तार वाढत असतानाच पायाभूत सुविधांवर ताण येत आहे. त्यामुळे महापालिकेचे विभाजन करून स्वतंत्र नवी महापालिका करणे काळाची आवश्यकता आहे,' असा सूर चर्चासत्रात रविवारी उमटला. नव्या स्वतंत्र महापालिकेसाठी सर्वपक्षीय नेत्यांच्या संमतीने महापालिका विभाजनाचा प्रस्ताव राज्य सरकारला पाठविण्याचा निर्णयही चर्चासत्रात घेण्यात आला.**




पुणे महापालिका विभाजन आणि नवीन महापालिका' यासंदर्भात पुणे शहर कृती समितीच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. माजी महापौर अंकुश काकडे, माजी नगरसेवक संजय बालगुडे, नरेंद्र व्यवहारे यांनी या चर्चासत्राचे आयोजन केले होते.माजी महापौर, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) शहराध्यक्ष प्रशांत जगताप, राजलक्ष्मी भोसले, श्रीकांत शिरोळे, आबा बागुल, उज्ज्वल केसकर, जालिंदर कामठे, आश्विनी कदम, सुभाष जगताप, नीता परदेशी, शिवा मंत्री, वीरेंद्र किराड, प्रवीण तुपे आणि नितीन कदम उपस्थित होते.पुणे महानगरपालिकेची स्थापना १९५० साली झाली. त्यानंतर १९९७ मध्ये पहिल्यांदा महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार झाला. त्यानंतर २०१७ पासून ३४ गावांचा समावेश झाला आणि त्यानंतर दोन गावे वगळण्यात आली. सातत्याने विविध गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समावेश सुरू आहे.

एकीकडे महानगरपालिकेचे क्षेत्र वाढत असताना महानगरपालिकेचे कर्मचारी, अधिकारी आणि एकूणच पायाभूत सोयीसुविधा मात्र वाढताना दिसत नाहीत. नव्याने समाविष्ट झालेली गावे झपाट्याने ओसाड होत आहेत, अशी भावना अनेक पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.'पुणे महापालिका राज्यातील भौगोलिकृष्ट्या सर्वाधिक मोठी महापालिका आहे. त्यामुळे प्रशासकीय ताणही वाढत आहे. क्षेत्रीय कार्यालये पुरेशी सक्षम नसल्यामुळे समाविष्ट गावांमधील विकासकामांवर त्याचा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे महापालिकेचे विभाजन आवश्यक आहे. त्यानुसार नगररचना तज्ज्ञांशी चर्चा करून विभाजनाचा आणि नव्या स्वतंत्र महापालिकेचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्याचे या चर्चासत्रात एकमताने निश्चित करण्यात आले,' असे अंकुश काकडे यांनी सांगितले.तर, 'प्रशासकीय व्यवस्थेवरील ताण लक्षात घेता विभाजनाची नितांत आवश्यकता असून, १९९७ पासून महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांसाठी स्वतंत्र नवी महापालिका असावी,' अशी मागणी असल्याची भूमिका प्रशांत जगताप यांनी मांडली.

### 34 गावांचा समावेश झाला

आणि नवीन महापालिका' यासंदर्भात पुणे शहर कृती समितीच्या वतीने चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.त्यानंतर १९९७ मध्ये पहिल्यांदा महानगरपालिका क्षेत्राचा विस्तार झाला. त्यानंतर २०१७ पासून ३४ गावांचा समावेश झाला आणि त्यानंतर दोन गावे वगळण्यात आली. सातत्याने विविध गावांचा महानगरपालिका क्षेत्रात समावेश सुरू आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या निर्देशानंतर प्रशासनाची कार्यवाही

# हिंजवडीच्या प्रश्नासंबंधी विभागीय आयुक्तांकडे बैठक!

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडी आयटी पार्क 'कोंडीमुक्त' करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या उपस्थितीमध्ये पहिली आढावा बैठक होणार आहे. त्यामध्ये संबंधित सर्व शासकीय विभागांचे अधिकारी सहभागी होतील, अशी माहिती भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिली.**




हिंजवडी आयटी पार्कमधील वाढत्या नागरी व वाहतूक समस्यांचा दोन दिवसांपूर्वी आढावा घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालबद्ध कार्यक्रम आखून, विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून सिंगल पॉईंट एथॉरिटी हिंजवडीचे प्रश्न मार्गी लावतील, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानंतर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही सुरु केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर होत असलेल्या बैठकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहेत.

महाराष्ट्रातील सर्वात मोठा 'आयटी हब' असलेला हिंजवडी परिसर समस्यांनी ग्रासला आहे. येथील वाहतूक कोंडीचा प्रश्न सध्या ऐरणीवर आहे. या परिसरात दररोज सुमारे पाच लाखांहून अधिक आयटी व्यावसायिक येथे ये-जा करतात. मात्र, अपुरी पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुर्दशा आणि समन्वयाचा अभाव या समस्यांमुळे रहिवासी व कर्मचाऱ्यांचे आयुष्य कठीण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर "हिंजवडी आयटी पार्कला अडथळ्यांमधून मुक्त करा" अशी मागणी या परिसरातील कर्मचारी, स्थानिक नागरिक,आयटी फोरम, सोसायटी फेडरेशन यांनी केल्यानंतर या मागणीकडे खऱ्या अर्थाने आमदार लांडगे यांनी लक्ष वेधले. त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी याबाबत संवाद साधत मुंबईमध्ये संबंधित विभाग, आयटी फोरम सोसायटी फेडरेशन अशा सर्वांची बैठक आयोजित केली होती.

दरम्यान, या सर्व घडामोडीनंतर आमदार महेश लांडगे यांनी याचा पाठपुरावा करत तातडीने बैठक घ्यावी, अशी मागणी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे केली. विभागीय आयुक्तांची पहिली बैठक असून या बैठकीसाठी सर्वांचेच लक्ष लागले आहे.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची माहिती





> हिंजवडीमधील समस्या सोडवण्यासाठी आम्ही पुढाकार घेतला. सर्व विभागांचे एकत्रीकरण करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक घेतली. मुख्यमंत्री यांच्या निर्देश दिल्यानुसार, 'सिंगल पॉइंट अथोरिटी' म्हणून विभागीय आयुक्त यांची बैठक होईल. आगामी काळात हिंजवडी समस्या मुक्त होईल, असा विश्वास आहे.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## शहरातील हॉटेल परमिट रूम आणि बार आज बंद

# तिप्पट कर वाढीचा निषेध ; हॉटेल व्यावसायिक संघटना आक्रमक

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: राज्य सरकारने मद्य विक्रेत्यांवर अन्यायकारकपणे करवाढ लादली आहे. या वर्षभरात तिसऱ्यांदा करवाढ केली आहे. त्यामुळे राज्यातील हॉटेल व्यावसायिक आर्थिक अडचणीत सापडतील आणि इच्छा नसताना देखील त्यांना आपला व्यवसाय बंद करावा लागेल पर्यायाने बेरोजगारीत वाढ होईल. राज्य सरकारने केलेल्या या अन्यायकारक करवाढीच्या विरोधात आज (दि. १४ जुलै) पिंपरी चिंचवड शहरातील सर्व हॉटेल्स परमिट रूम व बियर बार बंद ठेवून राज्य सरकारचा निषेध करण्यात येणार आहे अशी माहिती पिंपरी चिंचवड हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनचे अध्यक्ष गणेश कुदळे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.**

पिंपरी गणेश हॉटेल येथे झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत पिंपरी चिंचवड हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनचे पदाधिकारी उल्हास शेट्टी, प्रसाद शेट्टी, नवीन लायगुडे, पद्मनाभ शेट्टी, राकेश शेट्टी, बापूसाहेब फटांगरे, सुमित बाबर, सत्यविजय तेलंग, हरीश शेट्टी, सुधाकर शेट्टी, संतोष ठाकूर, तेजस जुनवणे, नंदकुमार काटे, अभिषेक शेट्टी, जगदीश शेट्टी, रमेश तापकीर, चेतन फुगे, किरण सुवर्णा, महेश नागराणी आदी पदाधिकारी तसेच हॉटेल व्यावसायिक उपस्थित होते.

राज्य सरकारने लादलेल्या अन्यायकारक करवाढीच्या विरोधात महाराष्ट्र राज्यातील हॉटेल व्यावसायिकांच्या 'आहार' (ऑल इंडिया हॉटेल्स अँड रेस्टॉरंट असोसिएशन) या शिखर संघटनेने सोमवारी (१४ जुलै) बंद पुकारला आहे. राज्यभरातील २० हजारांहून अधिक हॉटेल आणि रेस्टॉरंट या बंद मध्ये सहभागी होणार आहेत.



### करवाढीमुळे भ्रष्टाचार वाढेल : उद्योजक नवीन लायगुडे

असोसिएशनच्या वतीने यापूर्वी अनेक वेळा सरकारला निवेदन देण्यात आले. मात्र सरकारकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे बंदचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहारच्या नेतृत्वाखालील २० हजारांहून अधिक हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांनी सरकारच्या अन्यायकारक कर धोरणांचा विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे असे पद्मनाभ शेट्टी यांनी सांगितले. या अन्यायकारक करवाढी मुळे भ्रष्टाचार वाढेल असे मत नवीन लायगुडे यांनी सांगितले.

यामध्ये पिंपरी चिंचवड शहरातील हॉटेल व्यवसाय बंद ठेवून निषेध करणार आहे असे उल्हास शेट्टी यांनी सांगितले.या अन्यायकारक करवाढी मुळे दीड लाख कोटी रुपयांची उलाढाल असलेला हा उद्योग अक्षरशः बंद होण्याची वेळ आली असल्याचे प्रसाद शेट्टी यांनी सांगितले.

असोसिएशनच्या वतीने यापूर्वी अनेक वेळा सरकारला निवेदन देण्यात आले. मात्र सरकारकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. त्यामुळे बंदचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहारच्या नेतृत्वाखालील २० हजारांहून अधिक हॉटेल आणि रेस्टॉरंट मालकांनी सरकारच्या अन्यायकारक कर धोरणांचा विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे असे पद्मनाभ शेट्टी यांनी सांगितले.

### हॉटेल व्यवसाय आर्थिक अडचणीत

कोरोना काळापासून संपूर्ण हॉस्पिटॅलिटी उद्योग मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरा जात आहे. त्यामुळे आज संपूर्ण महाराष्ट्रातील परवानाधारक हॉटेल आणि बार अँड रेस्टॉरंट बंद करण्याशिवाय पर्याय नाही. हा सरकारच्या दंडात्मक करव्यवस्थेचा निषेध करीत पिंपरी चिंचवड शहरातील सर्व हॉटेल्स व्यावसायिक या बंदमध्ये सहभागी होणार आहेत असे पत्र पिंपरी चिंचवड हॉटेल असोसिएशनच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आले आहे.



## भूमिका

**भारतातील जवळपास ४० फार्मास्युटिकल कंपन्या आणि हेल्थकेअर कॉर्पोरेट फम्र्सनी इलेक्टोरल बॉण्ड म्हणजेच निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून राजकीय पक्षांना सुमारे एक हजार कोटी रुपयांची देणगी दिली असल्याचे निवडणूक आयोगाने १४ मार्चला उघड केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले. याला कुणी अप्रत्यक्ष लाच म्हणेल, पण भारतीय औषध निर्मिती कंपन्यांचा राजकीय अर्थकारणात मोठा वाटा असतो, हेच यातून दिसले.**

# रोखे घेऊन औषध कंपन्या तंदुरुस्त!



औषध आणि सौंदर्य प्रसाधन कायदा, १९४० नुसार या कंपन्यांवर नियंत्रण केले जाते. विकल्या जाणाऱ्या औषधांच्या गुणवत्तेची चाचणी या कायद्यान्वये केली जाते. याची अंमलबजावणी राज्य अन्न व औषध प्रशासन यंत्रणेमार्फत करण्यात येते. निवडणूक रोखे खरेदीच्या ज्ञात यादीत निकृष्ट दर्जाच्या औषधांसाठी काही कंपन्यांची चौकशी याच यंत्रणेकडून सुरू होती. औषध नियमन धोरणांतर्गत औषध निर्मिती कंपन्यांना स्वस्त जमीन, कर सूट, अनुकूल धोरणे किंवा किंमत मर्यादा यामध्ये सवलती मिळत असतात. या कंपन्या विविध प्रकारे सत्तेत असणाऱ्या पक्षासोबत संगनमताने वागत व्यवसाय वाढवतात. निवडणूक रोखे खरेदी ही एक त्याच अर्थकारण व राजकारणाचा भाग आहे भारतीय औषध निर्मिती कंपन्यांमध्ये सर्वाधिक (५०२.५ कोटी रुपयांचे) रोखे खरेदीदार म्हणून सीरम इन्स्टिटयूट ऑफ इंडियाचा समावेश आहे. कोविड-१९ लस निर्मितीत मुख्य सहभाग राहिलेल्या या कंपनीला कोविड -१९ साथीच्या दरम्यान औषध निर्मिती व्यवसायातून नफा मिळवण्यास खूप मदत झाली. त्याखालोखाल मोठे रोखे खरेदीदार म्हणजे यशोदा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (१६२ कोटी रु.) आणि त्यापाठोपाठ डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज (८० कोटी रु.). या दोन्ही संस्थांना कर चोरीच्या आरोपांवरून आयकर विभागाने नोटीस बजावली होती. 'हेटेरो ग्रुप' ही हैदराबाद इथली, रेमडेसिव्हिर औषध निर्मिती करणारी कंपनी आहे. औषध बाजारातील प्रचंड मागणीमुळे या कंपनीला कोविड -१९ महामारीदरम्यान औषध निर्मिती व्यवसायातून नफा मिळवण्यास मदत झाली. या कंपनीने एप्रिल २०२२ मध्ये ३९ कोटी रुपयांचे रोखे विकत घेतले. मागील १० महिन्यांत, महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने या कंपनीला निकृष्ट औषधांसाठी सहा नोटिसा बजावल्या. महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाला प्रयोगशाळेत आढळले की रेमडेसिव्हिरच्या नमुन्यात पिवळय़ा रंगाचे द्रव होते. जुलै २०२१ मध्ये हेटेरोला याबद्दल पहिली नोटीस बजावण्यात आली होती. तर दुसऱ्या नमुना तपासणीत आवश्यकतेपेक्षा कमी औषध होते, म्हणून ऑक्टोबरमध्ये नोटीस बजावण्यात आली. डिसेंबर २०२१ मध्ये बजावलेल्या नोटिशीत, रेमडेसिव्हिरचा तिसरा नमुना नियमाची पूर्तता करणारा आढळला नाही. २०२१ मध्ये हेटेरोची इटबोर कॅप्सूल आणि मोनोसेफ ही इतर दोन उत्पादनेही निकृष्ट आढळली. ती अँटीफंगल वा जिवाणू संसर्गासाठी वापरली जातात. मानकांच्या उल्लंघनामुळे कंपनीचा उत्पादन परवाना निलंबित केला जाण्याची शक्यता होती. कंपनीने महाराष्ट्रातील निकृष्ट दर्जाच्या औषधांची बॅच परत मागवली. परंतु तेलंगणा अन्न व औषध प्रशासनाने हेटेरो कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही. हेटेरोने पुन्हा जुलै २०२३ मध्ये १० कोटी रुपयांचे बॉण्ड आणि ऑक्टोबर २०२३ मध्ये ११ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले. म्हणजे एकंदर ६० कोटींचे रोखे. 'डिव्हीज लॅबोरेटरीज' या कंपनीला फेब्रुवारी २०१९ दरम्यान, आयकर कायद्याच्या चौकशीचा सामना करावा लागला. या कंपनीने ५५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी केले. टोरेंट फार्मा ही गुजरातस्थित कंपनी आहे. तिने मे २०१९ ते जानेवारी २०२४ पर्यंत ७७.५ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले. या कंपनीचे डेप्लॅट-१५० हे अँटीप्लेटलेट औषध 'सॅलिसिलिक ॲसिड चाचणी'अंती २०१८ मध्ये महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने निकृष्ट घोषित केले होते. ऑक्टोबर २०१९ मध्ये, अमेरिकेच्या फूड अँड ड्रग ॲडमिनिस्ट्रेशनने या कंपनीला इशारा दिला.कंपनीचा उत्पादन परवाना रद्द होईल अशी शक्यता होती. मात्र, गुजरात सरकारने औषध कंपनीवर कोणतीही कारवाई केली नाही. सप्टेंबर २०१९ मध्ये, रक्तदाब कमी करण्यासाठी वापरण्यात येणारे 'लोसार एच' हे टॉरेंट फार्माचे औषध गुजरात अन्न आणि औषध प्रशासनाला 'निकृष्ट' आढळले. तर डिसेंबर २०२१ मध्ये महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने तपासलेले.

## संपादकीय »

### कफन बदला है!

***इंदिरा गांधी यांस 'जनसुरक्षा कायद्या'ची कल्पना सुचती तर, जयप्रकाश नारायण सरकारी आदेश न पाळण्याचे आवाहन करूच शकले नसते...***

महाराष्ट्र सरकारचे 'जनसुरक्षा विधेयक' मंजूर होणे आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे संजय गायकवाड यांचे गुंड-सद्दश रूप समोर येणे ही एकच घटना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कायद्याचा फोलपणा दाखवून देण्यास पुरेशी आहे. या विधेयकामागचा मूळ उद्देश असल्याचे सांगितले जाते. हिंसाचारातील बळींच्या आप्तेष्टांच्या वेदना तो हिंसाचार डाव्यांचा आहे की उजव्यांचा या वर्गवारीने कमी-जास्त होत नाहीत. हिंसाचार हा हिंसाचार असतो आणि त्यापासून जनसामान्यांस रोखणे हे कोणत्याही कल्याणकारी समाजात शासनाचे कर्तव्य.असे असू शकत नाही. त्यामुळे या जनसुरक्षा कायद्याच्या हेतूबाबतच संशय घेण्यास जागा आहे आणि या संजय गायकवाड नामे- नामचीन लोकप्रतिनिधीचा गुन्हा अ-दखलपात्र ठरवणारे सरकारचे वर्तन या संशयास बळकटी देणारे आहे.

'हेरगिरी, कट, परकीय शक्तींचा हस्तक्षेप, घुसखोरी या सर्वापासून स्थानिक जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी कडक सुरक्षा कायदा संमत करण्यात येत आहे. देशद्रोह आणि उठावासाठी प्रसंगी आजीवन कारावासाची शिक्षा होऊ शकते'.. हाँगकाँगमधील बीजिंगधार्जिण्या सरकारने मंगळवारी संमत केलेल्या सुरक्षा कायद्याचा बोलविता धनी कोण?

# लडाखी अस्मितेचा प्रश्न देशाचाही..!

अनुच्छेद ३७० रद्द झाल्याने ५ ऑगस्ट २०१९ रोजी लडाखला केंद्रशासित प्रदेश अशी स्वतंत्र ओळख मिळाली; तेव्हा लडाखींनी जल्लोषात या निर्णयाचे स्वागत केले होते. मात्र त्याच लडाखमध्ये आज प्रचंड असंतोष आहे. एवढा की गेले १६ दिवस लोक उणे तापमानातही उपोषणाला बसले आहेत. त्यांचे नेतृत्व करताहेत पर्यावरण कार्यकर्ते आणि मॅगसेसे पुरस्कार विजेते सोनम वांगचुक. जगातली सर्वात मोठी लोकशाही म्हणवणाऱ्या भारताचा भाग असूनही लडाखमधील रहिवासी 'आम्हाला आमचे लोकशाही अधिकार द्या' म्हणत रस्त्यावर उतरले आहेत. अवघ्या पाच वर्षांत तिथे असे काय पालटले आहे? जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या संस्कृतीत काहीच साम्य नाही. तरीही स्वातंत्र्यापासून पुढील ७२ वर्षे हा परिसर जम्मू-काश्मीरचा भाग म्हणूनच ओळखला जात होता. तेथील रहिवाशांत त्याविषयी असंतोष होता. १९६४ आणि १९८० मध्येही तो




आंदोलनांच्या स्वरूपात व्यक्त झाला. त्यामुळे प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मिळालेल्या केंद्रशासित दर्जाचे लडाखवासीयांकडून स्वागत होणे स्वाभाविकच होते; मात्र त्याच वेळी त्यांना एक शंकाही भेडसावू लागली होती. अनुच्छेद ३७० लागू असल्यामुळे जमीन खरेदी-विक्री व्यवहारांवर मर्यादा होत्या. परिणामी हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, ईशान्य भारताप्रमाणे लडाखमध्ये विकासाचा विस्फोट झाला नव्हता. आता केंद्रशासित दर्जामुळे हे सुरक्षाकवच मोडून पडेल, अशी भीती स्थानिकांना होती. ती दूर करण्याचा एक मार्ग होता, लडाखचा परिशिष्ट – ६ मध्ये समावेश करणे. त्यातून जल- जंगल- जमिनीवरचा स्थानिकांचा अधिकार अबाधित ठेवता आला असता. त्यांनी ती मागणी लावून धरली आणि केंद्रातील सत्ताधारी भाजपने ती पूर्ण करण्याचे आश्वासनही दिले. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यात हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. अनुसूचित जाती-जमाती आयोगाबरोबर झालेल्या बैठकांतही त्यासंदर्भात सहमती दर्शवण्यात आली होती, मात्र या घटनेला पाच वर्ष लोटली, तरीही या आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नाही. आता लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मागणी रेटली नाही, तर ती कधीच पूर्ण होणार नाही, अशी भीती स्थानिकांना वाटते आहे. आंदोलनस्थळी रोज जमणारी गर्दी हे त्याचेच प्रतिबिंब आहे.लडाख हे अस्थिर हिमालयातील समुद्रसपाटीपासून १२ ते १८ हजार हजार फूट उंचीवरचे शुष्क वाळवंट. हिअनेक दुर्मीळ प्रजातींचा हा अधिवास. वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती असलेल्या अनेक जमातींचे हे वसतिस्थान.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मद्यविक्रीचे नवे परवाने दिले जाणार नाहीत!

## उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार यांची ग्वाही

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**राज्यात मद्यविक्रीचे नवे परवाने दिले जाणार नाहीत, अशी ग्वाही राज्याचे उत्पादन शुल्क तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविवारी पुण्यामध्ये दिली. आपला मुलगा जय पवार याच्या मद्य निर्माण कंपनीला लाभ होईल असा कोणताही निर्णय उत्पादन शुल्क विभागाने घेतलेला नसून तसे असेल तर मला पुरवा द्या, अशी विचारणा अजित पवार यांनी हिंजवडी पाहणी दौऱ्यामध्ये पत्रकारांना केली.**



गृहविभागाने २६ जून रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला असून त्यामध्ये राज्यातील ४१ विदेशी मद्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना उत्पादन शुल्क विभागाच्या ८ महसुली विभागात प्रत्येक एक असे एकुण ३२८ किरकोळ मद्यविक्री दुकानाचे परवाने (एफएल २) दिले जाणार आहेत. 'लोकसत्ता'ने रविवारी यासदंर्भातील वृत्त दिले होते.१९७४ पासूनराज्यात किरकोळ मद्यविक्री दुकानांचे परवाने देणे बंद आहे. विधिमंडळाला विश्वासात घेतल्याशिवाय परवाने देता येत नाहीत. सध्या मद्यविक्रीची दुकाने स्थलांतर करता येतात. त्यासदंर्भातही जिल्हाधिकारी आणि उत्पादन शुल्क अधिक्षकाची समिती निर्णय घेते. माजी मंत्री संदीपान भुमरे यांच्या नातेवाईकांचा मद्यविक्रीचा परवाना हा २४ तासामध्ये स्थलांतरीत झाला, ही बाब असत्य आहे. वर्ष २०२३ मधले भुमरेयांचे प्रकरण आहे. हा परवाना स्थलांतर करण्यास दिड महिन्याचा कालावधी लागला', असे अजित पवार यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार हेउत्पादन शुल्क मंत्री, तसेच ते अनेक साखर कारखान्यांचे संचालक आहेत. त्यांच्या मालकीचे अनेक खाजगी साखर कारखाने आहेत. मद्य उत्पादन करणाऱ्या 'कॅपोविटज प्रा. लि. कंपनीत त्यांचा मुलग जय पवार हे भागीदार आहेत. मद्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना मद्यविक्रीचे नवे परवाने देण्याचे अजित पवार यांच्या विभागाने धोरण बनवले आहे. म्हणून मद्यविक्री दुकानांना परवाने देण्याची मंत्री उपसमिती आहे, तिच्या अध्यक्षपदावरुन अजित पवार यांना हटवण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी समाजमाध्यमांवर केली आहे.

सगळे साखर कारखाने यांचे, मद्यार्क कंपन्या यांच्या, मद्य निर्माण करणाऱ्या कंपन्यासुद्धा यांच्याच नातेवाईकांच्या. आणि आता मद्यविक्रीचे परवाने सुद्धा हेच घेणार आहेत. चांगले आहे. हा साधुसंतांचा महाराष्ट्र यांना बेवड्यांचा करायचा आहे. खरे तर हे महायुती सरकार नसून 'मॅकडॉल' सरकार आहे, असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले. राज्यात जे किरकोळ मद्यविक्री परवाने आहेत, त्यांची सरकारने यादी जाहीर करावी.

म्हणजे कळेल की सत्ताधाऱ्यांच्या घरात किती 'वाईन शॉप' आहेत. सत्ताधाऱ्यांच्या वाईन शॉपचे परवाने २४ तासात कुठून कुठेही स्थलांतर केले जातात. या सुंदर व दगडांच्या देशाला ते बेवड्यांचा देश करायला निघालेले आहेत, असे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले.गृहविभागाने २६ जून रोजी शासन निर्णय प्रसिद्ध केला असून त्यामध्ये राज्यातील ४१ विदेशी मद्य उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना उत्पादन शुल्क विभागाच्या ८ महसुली विभागात प्रत्येक एक असे एकुण ३२८ किरकोळ मद्यविक्री दुकानाचे परवाने (एफएल २) दिले जाणार आहेत.

### सत्ताधाऱ्यांना मद्यविक्री परवाने

१९७४ पासूनराज्यात किरकोळ मद्यविक्री दुकानांचे परवाने देणे बंद आहे. विधिमंडळाला विश्वासात घेतल्याशिवाय परवाने देता येत नाहीत. सध्या मद्यविक्रीची दुकाने स्थलांतर करता येतात. त्यासदंर्भातही जिल्हाधिकारी आणि उत्पादन शुल्क अधिक्षकाची समिती निर्णय घेते. माजी मंत्री संदीपान भुमरे यांच्या नातेवाईकांचा मद्यविक्रीचा परवाना हा २४ तासामध्ये स्थलांतरीत झाला, ही बाब असत्य आहे. वर्ष २०२३ मधले भुमरेयांचे प्रकरण आहे. हा परवाना स्थलांतर करण्यास दिड महिन्याचा कालावधी लागला', असे अजित पवार यांनी सांगितले.उपमुख्यमंत्री अजित पवार हेउत्पादन शुल्क मंत्री, तसेच ते अनेक साखर कारखान्यांचे संचालक आहेत. त्यांच्या मालकीचे अनेक खाजगी साखर कारखाने आहेत. मद्य उत्पादन करणाऱ्या 'कॅपोविटज प्रा. लि. कंपनीत त्यांचा मुलग जय पवार हे भागीदार आहेत.

# महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर!

## शेतकऱ्यांना ओळख क्रमांक काढण्याला प्राधान्य दिले जात

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत देशभरात शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्याचे काम सुरू आहे. राज्यात रविवार अखेर ९५ लाख ८५ हजार ५०१ शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक मिळाला आहे. शेतकऱ्यांना ओखळ क्रमांक देण्यात उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.**



केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असल्यामुळे शेतकऱ्यांना ओळख क्रमांक काढण्याला प्राधान्य दिले जात आहे. राज्यात १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकरी खातेदार आहेत. त्यापैकी १ कोटी ८ लाख ४ हजार ५४२ शेतकऱ्यांनी ओळख क्रमांकासाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी १ कोटी ८ लाख २ हजार ४१८ शेतकरी खातेदारांनी शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केले आहेत.त्यापैकी ९५ लाख ८५ हजार ५०१ शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक देण्यात आला आहे. राज्यात १.७१ कोटी शेतकरी खातेदार असले तरीही नोकरदार शेतकरी, घरे, शेतघरे बांधण्यासाठी शेतजमिनी खरेदी केलेल्या शेतकरी खातेदारांनी शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केलेले नाहीत. तसेच सरकारी योजनांचा लाभ न घेणाऱ्या शेतकऱ्यांनीही शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केलेला नाही.त्यामुळे राज्यात सरासरी १.७१ कोटींपेकी साधारण १.३० कोटी शेतकरी ओळख क्रमांकांसाठी अर्ज करतील, अशी माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असल्यामुळे शेतकऱ्यांना ओळख क्रमांक काढण्याला प्राधान्य दिले जात आहे. राज्यात १ कोटी ७१ लाख १० हजार ६९७ शेतकरी खातेदार आहेत. ४ हजार ५४२ शेतकऱ्यांनी ओळख क्रमांकासाठी नोंदणी केली.

### 1.71 कोटी शेतकरी खातेदार

शेतकरी खातेदारांनी शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केले आहेत.त्यापैकी ९५ लाख ८५ हजार ५०१ शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक देण्यात आला आहे. राज्यात १.७१ कोटी शेतकरी खातेदार असले तरीही नोकरदार शेतकरी, घरे, शेतघरे बांधण्यासाठी शेतजमिनी खरेदी केलेल्या शेतकरी खातेदारांनी शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केलेले नाहीत. तसेच सरकारी योजनांचा लाभ न घेणाऱ्या शेतकऱ्यांनीही शेतकरी ओळख क्रमांकासाठी अर्ज केलेला नाही.त्यामुळे राज्यात सरासरी १.७१ कोटींपेकी साधारण १.३० कोटी शेतकरी ओळख क्रमांकांसाठी अर्ज करतील, अशी माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत देशभरात शेतकऱ्यांना ओळख क्रमांक देण्याचे काम सुरू आहे. राज्यात रविवार अखेर ९५ लाख ८५ हजार ५०१ शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक मिळाला आहे.

# विमान कोसळण्यापूर्वी नेमके काय झाले?

## विमान अपघात प्रकरणाचा तपशीलवार तपास अहवाल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबाद येथे १२ जून रोजी एअर इंडिया बोईंग ७८७ ड्रीमलाइनर विमानाच्या अपघाताला आज एक महिना पूर्ण होत आहे. प्राथमिक तपास अहवालात असे दिसून आले आहे की, उड्डाणानंतर एका सेकंदात विमानाचे इंजिन इंधन नियंत्रण स्विच बंद झाले. विमान अपघात तपास ब्युरोने १२ जून रोजी घडलेल्या घडामोडींची तपशीलवार माहिती दिली आहे.**



### विश्वास कुमार यांच्या भावाने सांगितलं?

विश्वास कुमार यांच्या मनावर १२ जूनला झालेल्या अपघाताचा प्रचंड मानसिक आघात झाला आहे. त्यामुळे ते अजूनही अपघाताच्या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. त्यासाठी ते मानसोपचार तज्ज्ञांची भेट घेत आहेत अशी माहिती त्यांच्या भावाने दिली. लंडन या ठिकाणी जाणारं बोईंग 787 हे विमान उड्डाणानंतर काही मिनिटांत कोसळलं. त्यावेळी ४० वर्षीय विश्वास हे एकमेव प्रवासी त्या भीषण अपघातातून आश्चर्यकारकरित्या वाचले. देव तारी त्याला कोण मारी? या म्हणीचा त्यांची प्रत्यक्ष प्रत्ययच घेतला. या भीषण अपघातात त्यांचा भाऊ अजय यांचाही मृत्यू झाला."विश्वास कुमार यांना तो दिवस आठवला की अजूनही मनात कुठेतरी भीती वाटते. भावाच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर गहिरा परिणाम झाला आहे. विश्वास कुमार हे भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक आहेत.

अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सकाळपासून ड्रिमलायनरच्या काय काय हालचाली झाल्या, याची सविस्तर माहिती अहवालात देण्यात आली आहे.सकाळी ११.१७ वाजता: एअर इंडियाचे ड्रिमलायनर VT-ANB नवी दिल्लीहून अहमदाबादला उतरले.दुपारी १.१८.३८ वाजता: विमानतळावर बे ३४ वरून सदर विमान निघताना दिसून येते. दुपारी १:२५:१५: क्रू सदस्यांनी टॅक्सी क्लिअरन्सची परवानगी मागितल्यानंतर एअर ट्राफिक कंट्रोलकडून सदर परवानगी दिली जाते. यानंतर विमान रनवे २३ च्या दिशेने जाते.दुपारी १:३२:०३: विमान ग्राउंड कंट्रोलकडून टॉवर कंट्रोलकडे हस्तांतरित केले जाते. दुपारी १:३७:३३: उड्डाणासाठीची परवानगी मिळते. दुपारी १:३७:३७: उड्डाणासाठी विमान सज्ज होते. दुपारी १:३८:३९: विमान उड्डाण घेते. दुपारी १:३८:४२: विमानाने १८० नॉट्स इतका कमाल वेग प्राप्त केला. यानंतर अचानक इंजिन १ आणि इंजिन २ बंद झाले. इंजिनला इंधन पुरवठा करणारे स्विच रन वरून कटऑफवर गेल्यामुळे इंधन पुरवठा खंडित झाला.एका वैमानिकाने दुसऱ्याला विचारले की, तू कटऑफ केलास का? यावर दुसऱ्या वैमानिकाने उत्तर दिले, मी काहीही केले नाही. विमानतळावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये रॅम एअर टर्बाइन लगेच तैनात झाल्याचे दिसून आले. तसेच उड्डाणानंतर काही सेकंदात विमानाची उंची कमी होताना दिसली.दुपारी १:३८:४७: दोन्ही इंजिनचे काम हळूहळू निष्क्रिय होत जाते.


रॅटमधून हायड्रॉलिक पॉवर पुरवण्यास सुरुवात होते. दुपारी १:३८:५२: इंजिन १ चा इंधन कटऑफ स्विच रनवर परत आणला जातो. दुपारी १:३८:५६: इंजिन २ चाही इंधन कटऑफ स्विच पूर्ववत करण्यात येतो. दुपारी १:३९:०५: एका वैमानिकाने संकट काळातील 'मेडे, मेडे, मेडे' असा संदेश दिला. दुपारी १:३९:११: विमानातील डेटा रेकॉर्डिंग थांबते.दुपारी १:४४:४४: विमान कोसळल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विमानतळ परिसरातून अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी रवाना होतात. अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाचा जो अपघात झाला त्यात २४२ प्रवासी आणि क्रू मेंबर्ससह होते. त्यांच्यापैकी २४१ जणांचा मृत्यू झाला. या भीषण अपघातातून आश्चर्यकारक रित्या बचावलेले विश्वास कुमार हे अजूनही या अपघाताच्या धक्क्यातच आहेत. मानसिक बळ वाढवणारे उपचार ते घेत आहेत. विश्वास कुमार ११ A या सीटवरुन प्रवास करत होते. या सीटच्या जवळ एक्झिट गेट होतं त्यामुळे जेव्हा विमान कोसळलं तेव्हा ते एक्झिट गेटमधून बाहेर फेकले गेले आणि त्यामुळेच बचावले. १२ जूनला झालेल्या अपघाताच्या या धक्क्यातून विश्वास कुमार सावरलेले नाहीत.

# "भाई, मैने कन्या वध कर दिया"!

## राधिकाच्या हत्येनंतर वडिलाने काय सांगितलं? दीपक यादवचा खुलासा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हरियाणामधील टेनिसपटू राधिका यादव हिची हत्या वडील दीपक यादवने केल्याची घटना नुकतीच घडली. गोळ्या झाडून राधिकाची हत्या केल्याच्या घटनेनंतर गुरुग्राममध्ये मोठी खळबळ उडाली होती. या घटनेनंतर आरोपी दीपक यादवला पोलिसांनी अटक केलं असून न्यायालयाने आरोपीला कोठडी सुनावली आहे. दरम्यान, या घटनेचा तपास पोलीस करत आहेत. तपासात अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत.**





### दीपक यादवला पोलीस कोठडी

या प्रकरणातील आरोपी दीपक यादवने पोलिसांच्या चौकशीत मुलीच्या हत्येची योजना बनवल्याचे कबूल केले, इतकेच नाही तर मुलीला गोळ्या घालण्याच्या आधी त्याने मुलाला दूध घेऊन येण्यासाठी घराबाहेर पाठवलं होतं. दरम्यान दीपक यादव याची पत्नी आणि पीडितेची आई मंजू यादव यांनी पोलिसांना जबाब देण्यास नकार दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की, हत्येच्या वेळी ती फ्लॅटमध्ये उपस्थित होती, पण तिला ताप आला होता आणि तिने काहीही पाहिले नाही.या प्रकरणातील आरोपी दीपक यादवला शुक्रवारी न्यायालयात हजर करण्यात आलं. न्यायालयाने पोलिसांना चौकशीसाठी वेळ मिळावा यासाठी यादवला एक दिवसाची कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने सांगितले की मुलगी जे काही करेल त्या सर्व गोष्टीत तिला पाठिंबा दिल्याने त्याच्या मूळ गावातील गावकरी त्याला टोमणे मारत होते.

राधिकाच्या हत्या प्रकरणानंतर आरोपी दीपक यादवने स्वतःच आपला गुन्हा कबूल केला आहे. आता दीपकबाबत बोलताना राधिका यादवच्या काकाने सांगितलं की, आरोपीने राधिकावर पाच गोळ्या झाडून तिचा जीव घेतल्याबद्दल त्याला फाशी देण्याची मागणी केली आहे. राधिकाची हत्या केल्याची कबुली पोलिसांसमोर दीपक यादवने दिली आहे. तसेच जर फाशी देण्याचा काही नियम असेल तर या गुन्ह्यासाठी फाशी द्यावी असंही आरोपीने म्हटलं आहे, अशी माहिती विजय यादव यांनी सांगितली आहे.

दरम्यान, विजय यादव यांनी एएनआयशी बोलताना म्हटलं की, "आरोपी दीपक यादवने राधिकाची हत्या केल्यानंतर कुटुंबीयांना सांगताना तो म्हणाला की, 'भाई, मैने कन्या वध कर दिया.

मुझे मार दो'. पण त्याने हत्येचं कारण सांगितलं नाही. तसेच आरोपी दीपकने पोलीस ठाण्यातही असं सांगितलं की, जर फाशी देण्याचा नियम असेल तर फाशी द्या", अशी माहिती विजय यादव यांनी दिली आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स नाऊने दिलं आहे.राधिका यादव या २५ वर्षीय टेनिसपटूच्या हत्येच्या प्रकरणात पोलिसांकडून तपास केला जात आहे. राधिकाची तिच्यात वडीलांनी घरात गोळ्या घालून हत्या केली असून आता पोलीस तिच्या आईला या हत्येबाबत कितपत माहिती होती याचा तपास करत आहेत.

# दीपिका कक्करची प्रकृती पुन्हा बिघडली?



प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री दीपिका कक्कर काही दिवसांपासून तिच्या आरोग्याच्या समस्यांमुळे चर्चेत होती. या वर्षी मे महिन्यात दीपिकाने तिला दुसऱ्या टप्प्यातील यकृताचा कर्करोग झाल्याचे उघड केले होते. गेल्या महिन्यात दीपिकाने यकृताच्या कर्करोगावर शस्त्रक्रिया केली. तिच्यावरील ही शस्त्रक्रिया १४ तास चालली आणि डॉक्टरांनी ट्यूमर काढून टाकला. सध्या दीपिका कर्करोगमुक्त आहे. दीपिका तिच्या घरी परतली आहे आणि ती आता पूर्वीपेक्षा खूपच बरी आहे.दुसरीकडे शोएब वेळोवेळी त्याच्या व्लॉगद्वारे दीपिकाच्या आरोग्याच्या अपडेट्स शेअर करत राहतो. अशा परिस्थितीत आता शोएबने पुन्हा दीपिकाबद्दल आणखी एक अद्ययावत अशी माहिती दिली आहे.शोएब इब्राहिमने त्याच्या नवीनतम व्लॉगमध्ये मुलगा रुहानबरोबरचा त्याचा दिवस कसा होता हे दाखवले. त्याबरोबरच शोएबने सांगितले, "दीपिकाची टार्गेटेड थेरपी आजपासून सुरू झाली आहे. आज पहिला दिवस आहे आणि आता तिला बरं वाटत आहे. पण, दुसऱ्या दिवशी दीपिकाला काही त्रास झाला. तिच्या तोंडात फोड आले." शोएब पुढे म्हणाला, "थेरपीनंतर दीपिकाने त्याला सांगितले की, तिला खूप थकवा जाणवत आहे; पण काही फरक पडत नाही. ती रुहानबरोबर बाहेर गेली होती. कदाचित म्हणूनच तिला थकवा जाणवत असेल. तोंडात फोड आल्याबद्दल दीपिका म्हणाली, "डॉक्टरांनी सांगितले होते की, अल्सर होऊ शकतात. त्यासाठी शक्य तितके पाणी प्यावे लागेल. म्हणून मी माझे पाण्याचे सेवन वाढवले. मला वाटते की, ते ठीक होईल."

# मराठी अभिनेत्याचा 'तो' व्हिडीओ चर्चेत

गेले काही दिवस राज्यभरात हिंदी-मराठी भाषेचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. राज्यातील शाळांमध्ये पहिली पासूनच्या हिंदी सक्तीमुळे हा विषय चर्चेत आला. पहिलीपासूनच्या हिंदी सक्तीला अनेकांनी विरोध केला होता. त्यानंतर शासनाने जीआरही रद्द केले. हिंदी भाषेबद्दलचे दोन्ही जीआर रद्द झाल्यानंतरही मराठी भाषेचा विषय अजून संपलेला नाही. अनेक ठिकाणी मराठी बोलण्याचा आग्रह केला जात आहे. त्यात काही लोकांकडून मराठी भाषेच्या मुद्द्याला राजकीय रंग दिला जात आहे. मराठी बोलण्यावरून काहीजण प्रक्षोभक वक्तव्य करत आहेत. सोशल मीडियावर मराठी माणसांकडून अमराठी माणसाला मारहाण केली जात असल्याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यामुळे मराठी माणसाबद्दल गैरसमज निर्माण होत आहे. या गैरसमजाबद्दल लोकप्रिय मराठी अभिनेत्याने व्हिडीओ शेअर केला आहे. 'तुला शिकवीन चांगलाच धडा' फेम स्वप्नील राजशेखर यांनी मराठी-हिंदीच्या वादावर व्हिडीओ शेअर केला आहे.या व्हिडीओत ते असं म्हणतात, "आम्ही मराठी लोक... मग तो सामान्य मराठी माणूस असो किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचा एखादा छोटा-मोठा नेता असो. तो कायम 'जय हिंद जय महाराष्ट्र' म्हणतो. आजपर्यंत कोणीच 'जय महाराष्ट्र' आधी आणि नंतर 'जय हिंद' असं म्हटलेलं नाही.



अआपल्या भारतीय सैन्याच पाहा ना... भारतातल्या प्रत्येक भागातून आणि महाराष्ट्रातूनही अनेक तरुण सैन्यात भरती होत आहेत. देशासाठी आपलं बलिदान देतात."यापुढे ते म्हणतात, "मराठी मानसिकता जर संकुचित असती; तर इतक्या वर्षांपासून जे लोक इथे राहत आहेत, जे अमराठी लोक महाराष्ट्रात राहत आहेत, जे मराठी लोकांबरोबर चांगली मराठी भाषा बोलतात आणि इथली संस्कृती जाणतात, तसंच जे इथे राहून आपला उदरनिर्वाह करतात ते हे सगळं करू शकले असते का?

# रुपेरी वाळूत बनात ये ना

जवळपास वर्षभर प्रेक्षकांचं मनोरंजन केल्यावर 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेने नुकताच सर्वांचा निरोप घेतला. 'झी मराठी' वाहिनीवर १८ मार्च २०२४ रोजी, अभिनेत्री वल्लरी विराज आणि अभिनेता राकेश बापट यांची प्रमुख भूमिका असलेली 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका सुरू झाली होती. या मालिकेने प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन केलं. याशिवाय 'झी मराठी'च्या पुरस्कार सोहळ्यात या मालिकेला बहुतांश पुरस्कारांनी देखील सन्मानित करण्यात आलं होतं. 'नवरी मिळे हिटलरला' ही मालिका ऑफ एअर होणार असल्याची बातमी समोर आल्यावर याच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली होती. २५ मे २०२५ रोजी या मालिकेने सर्वांचा निरोप घेतला. मात्र, यामधील लीला, अभिराम, दुर्गा, सरोजिनी, किशोर ही सगळी पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहेत.'नवरी मिळे हिटलरला' मालिकेतील मुख्य अभिनेत्री वल्लरी विराज सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. तिचे डान्स व्हिडीओ सर्वत्र विशेष लोकप्रिय ठरतात. अभिनेत्रीने नुकतंच 'रुपेरी वाळूत माडांच्या बनात ये ना' या गाण्यावर सुंदर नृत्य सादरीकरण करून सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. हे नृत्य सादर करताना तिला आलापिनी निसळ या अभिनेत्रीने साथ दिली. आलापिनीने 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत रेवतीची भूमिका साकारली होती. वल्लरी आणि आलापिनीच्या सुंदर एक्स्प्रेशन्सनी या व्हिडीओत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. वल्लरीने या व्हिडीओला, "कॉफी शॉपपेक्षा आम्ही माडाचं बन निवडलंय" असं कॅप्शन दिलं आहे.

# सासू अन् सुनेची जोडी पुन्हा एकत्र

मृणाल कुलकर्णी आणि शिवानी रांगोळे या सासू-सुनेची जोडी मराठी कलाविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. या दोघींचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. शिवानी आणि विराजस यांचा लग्नसोहळा २०२२ मध्ये थाटामाटात पार पडला होता. मृणाल कुलकर्णी शिवानीला आधीपासूनच ओळखत होत्या. या दोघींनी एका प्रोजेक्टदरम्यान एकत्र काम देखील केलेलं होतं. त्यामुळे त्यांच्यात पहिल्यापासून खूपच सुंदर बॉण्डिंग आहे. मृणाल कुलकर्णी आणि शिवानी रांगोळे यांची जोडी प्रेक्षकांमध्येही लोकप्रिय आहे. या दोघींकडे पाहून प्रत्येकाला सासू-सुनेचं बॉण्डिंग असंच असावं असं वाटतं. प्रेक्षकांच्या या दोन लाडक्या अभिनेत्री आता पुन्हा एकदा एकत्र झळकणार आहेत. याबद्दल शिवानीने पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे.शिवानी रांगोळे, मृणाल कुलकर्णी आणि अभिनेता शिवराज वायचळ हे कलाकार गो.नी.दांडेकर यांच्या संत साहित्यावर आधारित 'कोऽहम्' हे अभिवाचन सादर करणार आहेत.

# अर्णव-ईश्वरीच्या नात्यात गैरसमजामुळे येणार नवीन वळण



स्टार प्रवाहवर गेल्यावर्षी नवीन मालिका प्रेक्षकांच्या भेटीला आली, ही मालिका म्हणजे 'तू ही रे माझा मितवा'. २३ डिसेंबर २०२४ पासून ही मालिका प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. मालिकेत येणाऱ्या नवनवीन ट्विस्टमुळे ही मालिका प्रेक्षकांचं चांगलंच मनोरंजन करत आहे. मालिकेतील अर्णव-ईश्वरी म्हणजेच अभिजीत आमकर आणि ईश्वरी जोग ही नवीन जोडीही प्रेक्षकांच्या पसंतीस पडत आहे. मालिका सुरू झाल्यापासूनच अर्णव-ईश्वरीमध्ये सारखीच भांडणं होत असल्याचे पहायला मिळत होते. मात्र आता कुठेतरी अर्णवच्या मनात ईश्वरीबद्दल प्रेमभावना निर्माण झाली आहे. याबद्दल त्याने अजून ईश्वरीला काही सांगितलेलं नाही. पण हे सांगण्यासाठी तो प्रयत्न करत असल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच आता त्यांची प्रेमकहाणी सुरू होण्याआधीच संपणार की काय? असं वाटत आहे. ईश्वरीने नुकताच तिचा नवीन व्यवसाय सुरू केला आहे आणि या व्यवसायाच्या पूजेच्या दिवशी अर्णवला राकेशचाही संशय आला आहे. त्यात भर म्हणजे ईश्वरीच्या आईचं आणि आत्याचं ईश्वरीचं राकेशशी लग्न लावून देणार असल्याचं बोलणं अर्णवने ऐकलं आहे. त्यामुळे अर्णव आता ईश्वरीकडे त्याचं प्रेम व्यक्त न करता लावण्याशी लग्न करण्याचा निर्णय घेणार आहे. मालिकेतील या नवीन ट्विस्टचा प्रोमो नुकताच समोर आला आहे. या नवीन प्रोमोमध्ये ईश्वरी अर्णवला पेढा देते, तेव्हा अर्णव तिला म्हणतो, "पेढ्यांवरुन मला आठवलं... मला 'ईश्वरी स्वीट्स'ला एक मोठी ऑर्डर द्यायची आहे. अर्णव राजेशिर्के लावण्याबरोबर लग्न करत आहे. तू सुद्धा राकेशशी लग्न करत आहेस ना? त्याबद्दल तुझं अभिनंदन.

# सायना नेहवाल-पारुपल्ली कश्यप विभक्त!

## सायनाने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताची प्रसिद्ध बॅडमिंटनपटू सायना नेहवाल आणि तिचा पती भारतीय बॅडमिंटनपटू पारुपल्ली कश्यप विभक्त होत असल्याची माहिती सायना नेहवालने पोस्ट शेअर करत दिली आहे. सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप हे करियरच्या सुरुवातीपासून एकमेकांना ओळखतात आणि बॅडमिंटनच्या कोर्टवर दोघेही प्रेमात पडले होते. २०१८ मध्ये लग्न झाल्यानंतर आता हे बॅडमिंटनपटू जोडपं वेगळं होणार आहे.**



सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप यांनी एकत्र बॅडमिंटनचे धडे गिरवले आहेत. सायना आणि कश्यप एकत्र खेळायचे. यादरम्यान त्यांची मैत्री झाली आणि ही मैत्री प्रेमात कशी खुलत गेली़ी हे त्यांनाही कळलं नाही. एका दशकभराचा काळ एकमेकांना डेट केल्यानंतर, दोघांनीही १४ डिसेंबर २०१८ मध्ये लग्न केलं.सायना नेहवालने इन्स्टाग्रामवर अचानक पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला. सायनाने या पोस्टमध्ये लिहिलं आहे, "कधी कधी आयुष्य आपल्याला वेगळ्या वळणावर घेऊन जातं. बराच विचार केल्यानंतर आता कश्यप पारुपल्ली आणि मी वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही दोघेही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी स्थैर्य, यश आणि शांततापूर्ण जीवन जगणं निवडत आहोत.". या प्रवासात पुढे जाताना मी चांगल्या शुभेच्छा देत सर्व छान आठवणींसाठी आभार मानते."सायना आणि ३८ वर्षीय कश्यप गेल्या ७ वर्षांपासून लग्नबंधनात होते. दोघांनीही २०१८ मध्ये त्यांच्या लग्नाची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते, कारण बराच काळ या दोन्ही स्टार्सनी त्यांचे नाते मीडिया आणि चाहत्यांच्या नजरेपासून दूर ठेवले होते. दोघांची भेट हैदराबादमधील दिग्गज भारतीय बॅडमिंटनपटू पुलेला गोपीचंद यांच्या अकादमीत झाली, जिथे दोघेही दिग्गज प्रशिक्षकाच्या देखरेखीखाली प्रशिक्षण घेत होते. इथूनच त्यांची लव्हस्टोरी सुरू झाली.

सायना नेहवालच्या इन्स्टाग्रामवर कश्यपबरोबरचा एकही फोटो दिसत नाहीये. तर याउलट कश्यपच्या इन्स्टाग्रामवर सायनाबरोबरचे फोटो, व्हीडिओ अजूनही तसेच आहेत. मार्चमध्ये सायनाच्या वाढदिवसाला केलेली पोस्टही यामध्ये दिसत आहे. तर काही बॅडमिंटनसंबंधित सायनाबरोबरचे व्हीडिओदेखील आहेत.सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप यांनी एकत्र बॅडमिंटनचे धडे गिरवले आहेत. सायना आणि कश्यप एकत्र खेळायचे. यादरम्यान त्यांची मैत्री झाली आणि ही मैत्री प्रेमात कशी खुलत गेली़ी हे त्यांनाही कळलं नाही. एका दशकभराचा काळ एकमेकांना डेट केल्यानंतर, दोघांनीही १४ डिसेंबर २०१८ मध्ये लग्न केलं.सायना नेहवालने इन्स्टाग्रामवर अचानक पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला. सायनाने या पोस्टमध्ये लिहिलं आहे, "कधी कधी आयुष्य आपल्याला वेगळ्या वळणावर घेऊन जातं. बराच विचार केल्यानंतर आता कश्यप पारुपल्ली आणि मी वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे.

आम्ही दोघेही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी स्थैर्य, यश आणि शांततापूर्ण जीवन जगणं निवडत आहोत.". या प्रवासात पुढे जाताना मी चांगल्या शुभेच्छा देत सर्व छान आठवणींसाठी आभार मानते."सायना आणि ३८ वर्षीय कश्यप गेल्या ७ वर्षांपासून लग्नबंधनात होते.

दोघांनीही २०१८ मध्ये त्यांच्या लग्नाची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते, कारण बराच काळ या दोन्ही स्टार्सनी त्यांचे नाते मीडिया आणि चाहत्यांच्या नजरेपासून दूर ठेवले होते. दोघांची भेट हैदराबादमधील दिग्गज भारतीय बॅडमिंटनपटू पुलेला गोपीचंद यांच्या अकादमीत झाली, जिथे दोघेही दिग्गज प्रशिक्षकाच्या देखरेखीखाली प्रशिक्षण घेत होते. इथूनच त्यांची लव्हस्टोरी सुरू झाली.सायना नेहवालच्या इन्स्टाग्रामवर कश्यपबरोबरचा एकही फोटो दिसत नाहीये. तर याउलट कश्यपच्या इन्स्टाग्रामवर सायनाबरोबरचे फोटो, व्हीडिओ अजूनही तसेच आहेत. मार्चमध्ये सायनाच्या वाढदिवसाला केलेली पोस्टही यामध्ये दिसत आहे.

### सर्वांना आश्चर्यचकित केले

सायना नेहवाल आणि पारुपल्ली कश्यप यांनी एकत्र बॅडमिंटनचे धडे गिरवले आहेत. सायना आणि कश्यप एकत्र खेळायचे. यादरम्यान त्यांची मैत्री झाली आणि ही मैत्री प्रेमात कशी खुलत गेली़ी हे त्यांनाही कळलं नाही. एका दशकभराचा काळ एकमेकांना डेट केल्यानंतर, दोघांनीही १४ डिसेंबर २०१८ मध्ये लग्न केलं.सायना नेहवालने इन्स्टाग्रामवर अचानक पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला. सायनाने या पोस्टमध्ये लिहिलं आहे, "कधी कधी आयुष्य आपल्याला वेगळ्या वळणावर घेऊन जातं. बराच विचार केल्यानंतर आता कश्यप पारुपल्ली आणि मी वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. आम्ही दोघेही स्वतःसाठी आणि एकमेकांसाठी स्थैर्य, यश आणि शांततापूर्ण जीवन जगणं निवडत आहोत.". या प्रवासात पुढे जाताना मी चांगल्या शुभेच्छा देत सर्व छान आठवणींसाठी आभार मानते."सायना आणि ३८ वर्षीय कश्यप गेल्या ७ वर्षांपासून लग्नबंधनात होते. दोघांनीही २०१८ मध्ये त्यांच्या लग्नाची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते.

# वॉशिंग्टन सुंदरची स्वप्नवत स्पेल!

## 4 विकेट्स घेत लॉर्ड्सवर भारतासाठी ठरला 'ट्रम्पकार्ड'

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये तिसऱ्या कसोटी सामन्याचा थरार लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिला डाव बरोबरीत राहिला. भारतीय गोलंदाजांनी इंग्लंडचा पहिला डाव ३८७ धावांवर संपुष्टात आणला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाचा डाव देखील ३८७ धावांवर आटोपला. त्यामुळे दुसरा डाव हा शून्यापासून सुरू होणार होता. दुसऱ्या डावात भारताचे गोलंदाज इंग्लंडवर भारी पडले.**





भारताकडून गोलंदाजी करताना वॉशिंग्टन सुंदरने अतिशय सुंदर गोलंदाजी केली.या सामन्यातील तिसऱ्या दिवसाचा शेवट हा एखाद्या चित्रपटाच्या सीनपेक्षा कमी नव्हता. भारताचा डाव संपल्यानंतर दोन षटकांचा खेळ होणार होता.

पण, जॅक क्रॉलीने वेळ वाया घालवल्यामुळे केवळ एक षटकाचा खेळ झाला. याचे पडसाद चौथ्या दिवशी पडणार हे सर्वांनाच माहीत होतं आणि झालंही तसंच. भारताची वेगवान गोलंदाजांची तोफ चौथ्या दिवशी चांगलीच धडाडली. नितीश कुमार रेड्डीने जॅक क्रॉलीला झेलबाद करत माघारी धाडलं. मोहम्मद सिराजने बेन डकेटला बाद केलं. त्यानंतर मोहम्मद सिराजने ओली पोपलाही बाद करत माघारी धाडलं. आकाशदीपने दुखापतग्रस्त असतानाही हॅरी ब्रुकची दांडी गुल केली. इंग्लंडचे टॉप ऑर्डरचे फलंदाज स्वस्तात माघारी परतले होते. त्यामुळे भारताचं अर्ध काम पूर्ण झालं होतं. उर्वरीत काम वॉशिंग्टन सुंदरने पूर्ण केलं.

### वॉशिंग्टन सुंदरची ड्रीम स्पेल

वॉशिंग्टन सुंदरने या डावात गोलंदाजी करताना १२.१ षटकात अवघ्या २२ धावा खर्च करून ४ गडी बाद केले. सर्वात आधी त्याने इंग्लंडचा प्रमुख फलंदाज जो रूटला त्रिफळाचित करत इंग्लंडला पूर्णपणे बॅकफूटवर ढकललं. त्यानंतर जेमी स्मिथ, बेन स्टोक्सला देखील त्रिफळाचित केलं. शेवटी शोएब बशीर आणि जोफ्रा आर्चरची जोडी मैदानावर होती. सुंदरने बशीरलाही त्रिफळाचित केलं आणि इंग्लंडचा दुसरा डाव १९२ धावांवर आटोपला.या सामन्यातील पहिल्या डावात दोन्ही फलंदाजांनी ३८७ धावा केल्या होत्या.

महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
।दि. 14 जुलै 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# भक्तिमय वातावरणात ‘ज्ञानवर्धिनी’मध्ये गुरुपौर्णिमा साजरी

## शिक्षण विश्व: जीवनातील मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून शिक्षकांचा गौरव


। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्ञानवर्धिनी महाविद्यालयात गुरुपौर्णिमा भक्ती आणि उत्साहात साजरी करण्यात आली.**

या कार्यक्रमात बी एस सी कॉम्प्युटर सायन्स आणि बी बी ए च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जीवनातील मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून शिक्षकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पारंपारिक दीपप्रज्वलन समारंभाने झाली, गाणी आणि नृत्य अशा सांस्कृतिक सादरीकरणांनी चारित्र्य आणि ज्ञान घडवण्यात गुरुंचे महत्त्व मुलांनी अधोरेखित केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त करणारी भाषणे सादर केली. प्राचार्य डॉ. सुनिता डाकले यांनी शिक्षणाचे कालातीत मूल्य आणि शिक्षकांबद्दलचा आदर यावर मुलांना मार्गदर्शन केले. प्राध्यापकांचा स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची ंगता झाली.






Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वकृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

